**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शुक्रवार दिनांक १८ सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या....**

1. **भारताचा जीडीपी वाढीचा वास्तविक दर चालू आर्थिक वर्षात ७ टक्के राहील असा 'मूडीज' या मानांकन संस्थेचा अंदाज**
2. **पंतप्रधान उद्या 20 व्या राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात ५१ हजारांहून अधिक नवनियुक्तांना नियुक्तीपत्रांचं वितरण करणार : आयकर विभागाद्वारे रोजगार मेळ्याचं नागपुरात आयोजन**
3. **यवतमाळच्या मुकुटबन ते चंद्रपूरच्या गडचांदूर नवीन रेल्वेमार्गासाठी 493 कोटी रुपयांची मंजुरी**
4. **नागपुरातील इंदोरा चौक ते दिघोरी चौक उड्डाणपुलाचं उद्या होणार लोकार्पण आता सविस्तर बातम्या**

वृद्धी दर

भारताच्या देशांतर्गत सकल उत्पादन अर्थात जीडीपीचा वास्तविक वृद्धीदर चालू आर्थिक वर्षात ७ टक्के राहील, असा अंदाज मूडीज या जागतिक मानांकन संस्थेनं वर्तवला आहे. याआधी हा दर ६ टक्के राहील, असा अंदाज या संस्थेनं वर्तवला होता. पश्चिम आशियातल्या युद्धपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, भारतीय अर्थव्यवस्थेच्या लवचिकतेमुळे हा दर १ टक्क्याने वाढल्याचं संस्थेचं म्हणणं आहे. जी-२०च्या सर्व सदस्य देशांपेक्षा भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचंही मूडीजनं म्हटलं आहे. २०२६च्या पहिल्या तिमाहीत भारताचा जीडीपीचा वास्तविक वृद्धिदर मागच्या वर्षीच्या या कालावधीच्या तुलनेत वाढून ८ पूर्णांक २ दशांश टक्के झाला आहे. गेल्या वर्षी हा दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के इतका होता. वाढती गुंतवणूक, पायाभूत सुविधांवर सरकारने केलेला खर्च, खासगी गुंतवणूक क्षेत्रातलं परिवर्तन आणि सेवा क्षेत्राच्या बळकटीकरणामुळे ही वाढ झाल्याचं मूडीजनं नमूद केलं आहे.

सेवा संकल्प अभियान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांचा प्रवास 'जनसेवा से देशसेवा' या मंत्राने प्रेरित असून, देशसेवेची त्यांची ही अविरत वाटचाल आजही सुरू आहे. सेवा आणि सुशासनाच्या या संकल्पनेतून प्रेरणा घेत, २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र सरकार सातत्यानं कार्यरत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून ही वाटचाल नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणत आहे. आजच्या विशेष मालिकेत, या दृष्टिकोनाचं प्रत्यक्ष कृतीत झालेलं रूपांतर 'मेक इन इंडिया' अभियानाच्या माध्यमातून कसं घडलं, याची माहिती आपण जाणून घेणार आहोत.

***मेक इन इंडिया अभियानाला २०१४ मध्ये सुरुवात झाली. उत्पादन क्षेत्राला चालना देणं, गुंतवणूक आकर्षित करणं, व्यवसाय सुलभ करणं आणि देशांतर्गत उत्पादन क्षमता विकसित करणं, हा या अभियानाचा उद्देश आहे. उत्पादन क्षेत्रातील ही वाटचाल आता केवळ कारखान्यांपुरती मर्यादित न राहता, संपूर्ण मूल्यसाखळीच्या विकासापर्यंत विस्तारली आहे. उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना अर्थात पीएलआय, सेमीकंडक्टर आणि घटक निर्मिती कार्यक्रम, औद्योगिक कॉरिडॉर, लॉजिस्टिक्स सुधारणा आणि नॅशनल सिंगल विंडो सिस्टिमच्या माध्यमातून उत्पादन परिसंस्था मजबूत करण्यात येत आहे. देशातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन २०१४-१५ मधील सुमारे एक लाख ९० हजार कोटी रुपयांवरून २०२५-२६ मध्ये १३ लाख ११ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचलं आहे. इलेक्ट्रॉनिक्सची निर्यातही ४ लाख २४ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. भारतात वापरल्या जाणाऱ्या मोबाईल फोनपैकी ९९ पूर्णांक २ टक्के मोबाइल फोन आता देशातच तयार होतात. देशात ३०० हून अधिक मोबाइल निर्मिती युनिट्स कार्यरत आहेत. २०२५ मध्ये स्मार्टफोन हा भारताचा सर्वाधिक निर्यात होणारा स्वतंत्र वस्तू-प्रकार ठरला असून मोबाइल निर्मितीच्या अनेक उच्च-तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये महिलांचा कामगारवर्गातील वाटा जवळपास ७० टक्के आहे. मेक इन इंडिया अभियानामुळे 'मेड इन इंडिया' ही केवळ उत्पादनावरील खूण न राहता, भारताच्या जागतिक उत्पादन क्षमतेचं प्रतीक बनत आहे.***

**नियुक्तीपत्रांचे वितरण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, १९ सप्टेंबरला दुपारी साडेबारा वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ५१ हजारांहून अधिक नवनियुक्त युवकांना नियुक्तीपत्रांचे वितरण करतील. यावेळी ते नवनियुक्त उमेदवारांना संबोधितही करतील. देशभरातील ४५ ठिकाणी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. महसूल, रेल्वे, गृह, आरोग्य, वित्तीय सेवा आणि संरक्षण

मंत्रालयांसह विविध विभागांमध्ये उमेदवार रुजू होतील. या २०व्या रोजगार मेळाव्यानंतर विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नियुक्तीपत्रे मिळालेल्या युवकांची संख्या सुमारे १२ लाख ७५ हजार होणार आहे.नागपूर येथील आयकर विभाग उद्या दुपारी 12:30 वाजता राजनगर स्थित 'राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय', इथं 'राष्ट्रीय रोजगार मेळाव्या'च्या 20 व्या टप्प्याचे आयोजन करत आहे. या कार्यक्रमात नव्याने नियुक्त झालेले उमेदवार, वरिष्ठ अधिकारी आणि सहभागी विभागांचे प्रतिनिधी एकत्र येणार असून, सार्वजनिक सेवेतील आपला व्यावसायिक प्रवास सुरू करणाऱ्या उमेदवारांसाठी हा कार्यक्रम महत्वाचा ठरेल.

**रोजगार महाकुंभ महाराष्ट्र**

युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती' या संकल्पनेनुसार राज्यभर २९ सप्टेंबरला एकाच दिवशी ५०० ठिकाणी 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' अंतर्गत रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. नागपूर जिल्ह्यात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहकार्यानं २५ ठिकाणी मेळावे होणार आहेत. विविध शैक्षणिक संस्था, कौशल्य विकास केंद्रे, औद्योगिक संस्था आणि उद्योजकांच्या सहभागातून हे मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी, अभियांत्रिकी, एमबीए तसेच विविध व्यावसायिक पात्रता असलेल्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. नामांकित कंपन्या आणि उद्योजक सहभागी होणार असून, युवक-युवतींनी आपल्या पात्रता आणि कौशल्यानुसार मेळाव्यांचा लाभ घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंचनामे आणि सर्वेक्षणाचे काम सुरू असून, अंतिम अहवाल आल्यानंतर शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. राज्यातील १८ जिल्ह्यांचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असून, अंतिम अहवाल मंगळवार किंवा बुधवारपर्यंत अपेक्षित आहे. संपूर्ण आणि अचूक माहितीच्या आधारे शेतकऱ्यांसाठी उपाययोजना तसेच केंद्र सरकारकडे पाठवायच्या प्रस्तावांचा निर्णय घेतला जाणार आहे. दुष्काळी परिस्थितीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले असून, सर्व विभागांना सर्वेक्षणाचे निर्देश दिले आहेत. प्रभावित भागांची प्रत्यक्ष पाहणी करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांना देण्यात आल्या आहेत.

**नवीन रेल्वेमार्ग**

मुकुटबन-गडचांदूरदरम्यान ३८ पूर्णांक २१ किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वेमार्गाच्या बांधकामासाठी भारतीय रेल्वेनं 493 कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे. दक्षिण मध्य रेल्वेअंतर्गत हा मार्ग विकसित करण्यात येणार आहे.यवतमाळ जिल्ह्यातील मुकुटबन आणि चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदूर हे औद्योगिक आणि खाण क्षेत्रासाठी महत्त्वाचे केंद्र आहेत. या रेल्वेमार्गामुळे सिमेंट कारखाने, कोळसा आणि चुनखडीच्या खाणींना अधिक सक्षम रेल्वे जोडणी मिळणार असून मालवाहतुकीला चालना मिळेल.या मार्गामुळे रेल्वे प्रवासाचं अंतर, वेळ आणि वाहतूक खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. तसंच विद्यमान वर्धा-माणिकगड मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होईल.प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर दरवर्षी सुमारे ६ पूर्णांक ०८ दशलक्ष टन मालवाहतुकीसह दररोज दोन्ही दिशांनी प्रत्येकी दोन मेमू गाड्या चालवण्याचं नियोजन आहे.नवीन मार्गामुळे कोळसा आणि सिमेंट उद्योगांना माजरी-नांदेड मार्गाशी थेट जोडणी मिळेल. त्यामुळे जालना, परभणी, छत्रपती संभाजीनगरसह महाराष्ट्र आणि कर्नाटकातील विविध ठिकाणी मालवाहतूक अधिक सुलभ होईल.या प्रकल्पामुळे गर्दीच्या बल्लारशाह-नागपूर मार्गावरील अवलंबित्व कमी होऊन यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यातील तुलनेनं कमी रेल्वे जोडणी असलेल्या भागांनाही फायदा होणार आहे.

**उड्डाणपुल लोकार्पण**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे नागपुरातील इंदोरा चौक ते दिघोरी चौक अशा 8 पूर्णांक 9 किलोमीटर लांबीच्या उड्डाणपुलाचे लोकार्पण उद्या सायंकाळी 4 वाजता केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या उड्डाणपुलामुळे उत्तर नागपूर आणि दक्षिण नागपूर जोडले जाणार असून शहरातील घनदाट वस्ती मधून जाणाऱ्या उड्डाणपूलांपैकी हा पूल असणार आहे .यामुळे

वाहतुकीच्या कोंडीला आळा बसेल त्याचप्रमाणे अशोक चौक येथील चक्राकार - रोटरी मधून शहराच्या मुख्य चौकात पोहोचणे शक्य होणार आहे.

**विजय वडेट्टीवार**

SIR-२०२६ प्रक्रियेत विरोधकांच्या मतदारांची छाटणी केली जात असल्याचा संशय असून, निवडणूक आयोगाने मतदार यादीतील बदलांची बूथनिहाय माहिती पारदर्शकपणे जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी बोलतांना केली. पात्र नागरिकांचा मतदानाचा घटनात्मक हक्क हिरावला जाऊ नये, असे ते नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलतांना म्हणाले. दरम्यान, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्याऐवजी सरकार वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप त्यांनी केला. गणपती विसर्जनानंतर मराठवाडा आणि विदर्भात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काँग्रेस आंदोलन करणार असल्याची माहिती वडेट्टीवार यांनी दिली.

**नाना पाटोळे**

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचा दावा करत काँग्रेसने राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नागपुरात पत्रकार परिषद घेऊन महायुती सरकारवर जोरदार टीका केली. राज्यातील शेतकरी संकटात सापडला असून, डबल इंजिन सरकार दुष्काळाच्या प्रश्नावर निर्णय घेण्यात अपयशी ठरल्याचा आरोप पटोले यांनी केला.राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी काँग्रेसने केली आहे. गेल्या आठवड्यात काँग्रेसच्या शिष्टमंडळाने यासंदर्भात राज्यपालांची भेट घेतली होती. मात्र, अद्याप सरकारकडून ठोस मदत जाहीर करण्यात आलेली नसल्याचे पटोले यांनी म्हटले.शेजारील कर्नाटकात दुष्काळग्रस्तांसाठी निर्णय घेतले जातात, मग महाराष्ट्रात निर्णय घेण्यास विलंब का होत आहे, असा सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला.

**हवामान**

पावसाळा सुरू असतानाही अकोला जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत आहे. कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने दुपारच्या वेळी उन्हाची तीव्रता वाढली असून, उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. सकाळी काहीसा गारवा जाणवत असला तरी सकाळी १० वाजल्यानंतर तापमान झपाट्याने वाढत आहे. पावसाचा खंड आणि कमी पावसामुळे वातावरणातील या बदलाचा शेतीपिकांवरही परिणाम होण्याची चिंता व्यक्त होत आहे.दरम्यान, बंगालच्या उपसागरातील हवामानातील बदलामुळे महाराष्ट्र आणि गोवा परिसरात २० ते २५ सप्टेंबरदरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी व्यक्त केली आहे. विदर्भातील काही भागांत मध्यम पाऊस, तर २१ ते २८ सप्टेंबरदरम्यान राज्याच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे.दरम्यान, अकोला, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यांमध्ये आगामी काही तासांत तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यात तुरल ठिकाणी माध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तवल्यानुसार नुकतीच जोरदार पावसाची सुरवात झाली.

*****